**शिवतीर्थ**
**शिक्षण विभाग प्राथमिक**
**रायगड जिल्हा परिषद, अलिबाग**
**पत्ता:- कुंठेबाग, अलिबाग**
**ई-मेल:**eopri**raigad@gmail.com**

जा.क्र.राजिप/प्राथ.शिक्षण/आस्था-23/ / दिनांक :- / /

**प्रति,**

**अध्यक्ष/सचिव,**
**शारदा मनसुखलाल कोठारी चॅरीटेबल ट्रस्ट,**
**कानपुर,उत्तर प्रदेश.**

विषय :- महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 अंतर्गत शाळेस प्रथम मान्यता देण्याबाबत.

सदर्भ :- 1 शालेय शिक्षण विभागा कडील शासन ,मांन्यता पत्र क्र . एसएफएस-1024/प्र.क्र.807/एसएम 2 दिनांक. 13/04/ 2026.

2. शारदा मनसुखलाल कोठारी चॅरीटेबल ट्रस्ट,कानपुर,उत्तर प्रदेश यांचे पत्र क्र. दि.18/05/2026

महोदय

उपरोक्त संदर्भित पत्राच्या विषयानुसार कळविणेत येते की, महाराष्ट्र स्वयं अर्थ सहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 अंतर्गत**,कोठारी स्कूल,प्लॉट नं.६६,सेक्टर.०३,करंजाडे, ता.पनवेल जि.रायगड** माध्यम **इंग्रजी ,मंडळ सी.बी.एस.ई प्राथमिक** व **उच्च प्राथमिक इ. 1 ली ते 8 वी** या शाळेस मान्यता स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर संदर्भ क्रमांक-1 नुसार सन 2026-27 या शैक्षणिक वर्षात सुरु करण्याची मान्यता अटी व शर्तीच्या अधीन राहून देण्यात आली आहे.

शालेय शिक्षण विभागा कडील शासन मान्यता पत्र क्र. एसएफएस-1024/प्र.क्र.807/एसएम 2 दिनांक. 13/04/ 2026 मधील अटी व बालकाचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम 2009 मधील तरतुदी तसेच खालील अटींची पुर्तता करणे आवश्यक आहे.

1. शाळेबाहेर स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावरील परवानगी प्राप्त नवीन/दर्जावाढ प्राप्त शाळा असे जाहीर फलकावर दर्शविणे आवश्यक राहील.
2. बालकाचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम 2009 मधील तरतुद आणि महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 यातील सर्व तरतुदीचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक आहे.
3. महारष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियम, 2011 दिनांक 21 मार्च 2014 व महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) नियम 2016 दिनांक 13 एप्रिल 2016 मधील अटी व शर्तीची कार्यपध्दती संस्थेवर बंधनकारक राहील.
4. सदर स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावरील मान्यता मिळालेल्या संस्थेचे संबंधित अधिकाऱ्यांशी/शासनास पत्रव्यवहार करताना स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर नवीन शाळा/अर्जावाढ अशा प्रकारचे लेटर हेड वापरणे आवश्यक आहे.
5. मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या नियुक्तीस शैक्षणिक अर्हतेनुसार संबंधित शिक्षणाधिकारी यांच्याकडून मान्यता घेणे बंधनकारक राहील.
6. कर्मचारी संच मान्यता शिक्षणाधिकारी यांचे कडून मंजूर करुन घेणेत यावा.
7. शाळेचे हिशोब व सर्व प्रकारच्या नोंदवह्या अद्यावत ठेवणे आवश्यक आहे.

8. शासन आदेशातील तरतुदीनुसार शिक्षक पालक संघटनेची स्थापना करणे आवश्यक आहे.
9. मुला-मुलीसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे असणे आवश्यक आहे.
10. अग्निरोध संदर्भातील सुरक्षेबाबत योग्य ती कार्यवाही, विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या दृष्ठीने सर्व व्यवस्था व अग्निपासुन कुठल्याही दुर्घटना होऊ नये, याबाबत प्रतिबंधात्मक दक्षता घेणे बंधनकारक राहील.
11. शाळेने बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम 2009 मधील कलम 18 व महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम 2011 मधील नियम 11 अन्वये समक्ष प्राधिकाऱ्याकडून मान्यता घेण्यात यावी.
12. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 नुसार देण्यात आलेली परवानगी अशी परवानगी मिळाल्यापासून 18 महिन्याच्या आत व्यवस्थापनाने शाळा सुरु न केल्यास सदर परवानगी रद्दबातल ठरेल.
13. शासनाच्या/शिक्षण विभागाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाचे काटेकोरपणे पालक करणे आवश्यक आहे.
14 शासन निर्णय दिनांक 03/11/2009 मधील तरतुदीनुसार शासनाचा सार्वजनिक बाधकाम विभाक किंवा जिल्हा परिषद् सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंत्याकडून शाळेची इमारत नॅशनल बिल्डींग कोडप्रमाणे असल्याचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.
15. शासन निर्णय दिनांक 13 मे ,2025 अन्वये शाळेतील विदयार्थ्यांच्या सुरक्षा व सुरक्षिततेच्या अनुषंगाने करावयाच्या उपाययोजनांसंदर्भात दिलेल्या सर्वसमावेशक सूचनांची शाळेने काटेकोर अंमलबजावणी करणे अनिवार्य राहील.

वरिल क्र. 1 ते 15 अटींची पुर्तता करणेचे अटीवर **कोठारी स्कूल,प्लाट नं.६६,सेक्टर.०३,करंजाडे, ता.पनवेल जि.रायगड** माध्यम **इंग्रजी ,मंडळ सी.बी.एस.ई प्राथमिक** व **उच्च प्राथमिक इ. 1 ली ते 8 वी** या शाळेस प्रथम मान्यता देणेत येत आहे. सदर पत्रातील अटींचे उल्लंघन झाल्यास सदरची मान्यता रद्द समजणेत येईल याची नोंद घ्यावी.

Digitally signed by
Lalita Santosh Kawade
Date: 24-06-2026
11:32:45

**(ललिता दहितुले)**
**शिक्षणाधिकारी (प्राथमिक)**
**रायगड जिल्हा परिषद,अलिबाग**

प्रत:- मा.शिक्षण उपसंचालक,मुंबई विभाग,जवाहर बाल भवन,चर्नीरोड मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.

S. Sharma

PRINCIPAL
KOTHARI SCHOOL
PANVEL.